कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १०/१०/२०१७

# राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत पोलीस हवालदार संजय हजारे यांना सुवर्ण पदक

गडचिरोली जिल्हा पोलीस दलातील पोहवा/११६० संजय अशोकराव हजारे जेटीएससी या शाखेत नेमणुकीस असून त्यांनी राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक-५ दौंड येथे दिनांक ०४/१०/२०१७ ते ०७/१०/२०१७ पर्यंत आयोजित १८ वी महाराष्ट्र राज्य पोलीस रायफल, रिव्हाल्वर, पिस्टल व कार्बाइन नेमबाजी स्पर्धा-२०१७ मध्ये गडचिरोली जिल्हा पोलीस दलाचे वतीने सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील ५० गज एमपी-५ निलिंग पोझिशन या स्पर्धा प्रकारामध्ये भाग घेवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्यांच्या या यशस्वितेबद्दल मा. समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक-५ दौंड यांचे हस्ते सुवर्णपदक व प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला.

पोहवा संजय हजारे यांच्या या यशाबद्दल गडचिरोली जिल्हा पोलीस दलाचे वतीने जिल्हयाचे मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख साो., मा. अति. पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. महेश्वर रेड्डी, मा. अति. पोलीस अधिक्षक (प्रशासन) श्री. महेंद्र पंडीत, मा. अति. पोलीस अधिक्षक (नक्षल व क्राईम) श्री. हरी बालाजी, तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. सागर कवडे, मा. पोलीस उपअधिक्षक श्री. प्रदिप चौगावकर, प्रभारी अधिकारी प्रशिक्षक जेटीएससी प्रशिक्षण शाखा, विशेष अभियान पथक गडचिरोली व गडचिरोली जिल्हा पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी यांना शुभेच्छा देवून अभिनंदन केले.

